**ठळक बातम्या**

- संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्यापासून

- महाराष्ट्राचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधीमंडळात सादर होणार

- देशातल्या व्यावसायिक वाहन चालकांसाठी सहकारी संघटना स्थापन करण्याची केंद्र सरकारची योजना

- जपानमधे होक्काइडो किनाऱ्यावर विनाशकारी भूकंप होण्याचा तज्ज्ञांचा

**आणि**

- चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात न्यूझिलंडच भारतापुढं विजयासाठी २५२ धावांचं आव्हान /भारताची आश्वासक सुरुवात

**<><><><><>**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं दुसरं सत्र उद्यापासून सुरू होत असून ते ४ एप्रिलपर्यंत चालेल. या दुसऱ्या सत्रात २०२५-२६ च्या अनुदान मागण्या आणि विनियोग विधेयकावर चर्चा आणि मतदान होईल. या काळात एकंदर २० बैठका होतील. बँकिंग कायदे सुधारणा विधेयक, कोस्टल शिपिंग विधेयक आणि रेल्वे सुधारणा विधेयक यासह अनेक विधेयक या सत्रामध्ये मंजुरीसाठी चर्चेला घेतली जातील.

**<><><><><>**

महाराष्ट्राचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार आधी विधानसभेत आणि त्यानंतर

विधानपरिषदेत सादर करतील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्यासह काही महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

देशातल्या व्यावसायिक वाहन चालकांसाठी सहकारी संघटना स्थापन करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी आज केली. अहमदाबादमधे जेतलपूर इथं अहमदाबाद जिल्हा सहकारी बँकेच्या सुवर्णमहोत्सवी समारांभात आज ते बोलत होते. पुढच्या पाच वर्षांत दोन लाख सेवा सहकारी संस्था आणि प्राथमिक दूध उत्पादक संस्थांना सहकारी योजनेत समाविष्ट करण्याचं सरकारचं उद्दिष्ट असल्याचं ते म्हणाले.

त्याआधी, अमित शाह यांनी अहमदाबाद इथं सस्तु साहित्य मुद्रणालय ट्रस्टमध्ये २४ पुनर्मुद्रित पुस्तकांचं प्रकाशन केलं.

**<><><><><>**

देशातल्या सर्व नागरिकांसाठी आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे पी नड्डा यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण संस्थेच्या ४८ व्या वर्धापनदिन सोहळ्याला दूरदृश्यप्रणालीद्वारे ते आज संबोधित करत होते. देशातल्या आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, संशोधनाला मदत करण्यासाठी आणि त्यांच्या क्षमतांचा विकास करण्यासाठी राष्ट्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण संस्था आघाडीवर आहे, असं नड्डा म्हणाले.

केंद्रीय आरोग्य  आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनीही या कार्यक्रमाला संबोधित केलं. सरकार आरोग्य व्यवस्थेची व्याप्ती वाढवण्याचा प्रयत्न करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा देशात फूट पाडण्याचं काम करत असल्याचा आरोप माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केला आहे. ते आज मुंबईत पक्षाच्या निर्धार सभेत बोलत होते. वन नेशन वन इलेक्शन एकाधिकारशाहीकडे नेणारं असून त्याचा देशाला धोका आहे, अशी टीका त्यांनी केली. भाजपा महाराष्ट्राची अस्मिता पायदळी तुडवत आहे, असंही ते म्हणाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या मंगळावार पासून दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर जाणार आहेत. मॉरिशसच्या राष्ट्रीय दिन समारंभाला ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

<><><><><>

न्यूयॉर्क इथल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात उद्यापासून सुरू होणाऱ्या कमिशन ऑन द स्टेटस ऑफ विमेनच्या ६९व्या सत्रात भारताचं प्रतिनिधी मंडळ सहभागी होणार आहे. केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्याकडे या प्रतिनिधी मंडळाचं नेतृत्व असेल. या सत्रात अन्नपूर्णा देवी भारताचं म्हणणं मांडतील, तसंच  मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेतही त्या भाग घेतील. याशिवाय महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणाविषयीच्या इतर चर्चांमध्येही त्या सहभागी होणार असल्याची माहिती मंत्रालयानं दिली आहे.

<><><><><>

जपानमधे होक्काइडो किनाऱ्यावर विनाशकारी भूकंप येऊ शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे. तोहोकू आणि होक्काइडो विद्यापीठातल्या संशोधकांनी केलेल्या संशोधनातून हा इशारा दिला आहे. समुद्राखालच्या खंदकात अतिरिक्त उर्जा तयार झाल्यामुळे त्याचं ९ रिश्टर स्केल इतक्या तीव्र भूकंपात परिवर्तन होऊ शकतं, असं या संशोधकांचं म्हणणं आहे. पुढच्या ३० वर्षांत या प्रदेशात ८ पूर्णांक

८ शतांश किंवा त्याहून अधिक तीव्रतेचा भूकंप होण्याची शक्यता ७ ते ४० टक्के आहे, असंही या संशोधकांचं म्हणणं आहे.

**<><><><><>**

चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत सुरु असलेल्या अंतिम सामन्यात न्यूझिलंडनं भारतापुढं विजयासाठी २५२ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

न्यूझिलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला, आणि निर्धारित ५० षटकात ७ गडी गमावून २५१ धावा केल्या. डॅरिल मिशेलनं सर्वाधिक ६३ धावा केल्या. मायकेल ब्रेसवेलनं नाबाद ५३ धावांच योगदान दिलं. भारतातर्फे वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव यांनी प्रत्येकी २ बळी घेतले.

विजयी लक्ष्याचा पाठलाग करताना भारताची सुरुवात आश्वासक झाली. रोहित शर्मा आणि शुभमन गील यांनी पहिल्या गड्यासाठी १०५ धावांची भागीदारी केली.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा भारताच्या २५ षटकांत २ बाद १२२ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

५व्या खेलो इंडिया हिवाळी स्पर्धेला काश्मीरमधल्या गुलमर्ग इथं आजपासून सुरुवात झाली. आज पहिल्या दिवशी झालेल्या स्पर्धांमध्ये स्की पर्वतारोहण, अल्पाइन स्कीइंग, स्नोबोर्डिंग अशा विविध हिवाळी खेळांचा समावेश होता. ही स्पर्धा १२ मार्चपर्यंत सुरु राहणार असून देशभरातून ५५० हून अधिक खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सच्या जवानांनी काल संयुक्तपणे शोधमोहिम राबवून मोठ्या प्रमाणावर युद्धसामग्री जप्त केली. मणिपूरमध्ये जिरीबाम, तेंग्नोपाल, काकचिंग, उखरुल, इम्फाळ पूर्व आणि पश्चिमेच्या डोंगराळ

तसंच सखल भागातल्या जिल्ह्यांमध्ये मणिपूर पोलीस, सीआरपीएफ, बीएसएफ आणि आयटीबीपीच्या सहकार्याने ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत २५ शस्त्रं, आयईडी, ग्रेनेड, दारुगोळा आणि इतर युद्धसामग्री जप्त करण्यात आली. तसंच, कांगपोकपी जिल्ह्यातले बंकरही उद्धस्त करण्यात आले.

**<><><><><>**

मुंबईत होणाऱ्या वेव्हज् अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ॲनिमेशन स्पर्धा आयोजित केली आहे. भारतातल्या ऍनिमेशन क्षेत्राला चालना देण्यासह मांगा, वेबटून आणि ऍनिमेशन या शैलींमधल्या भारतीय प्रतिभेला जगासमोर आणणं हा या स्पर्धेचा उद्देश आहे.

या स्पर्धेसाठी नोंदणीसह अधिक माहितीकरता आपण वेव्हज् इंडिया डॉट ओआरजी या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

**<><><><><>**

नागपूरमधे मिहान इथं उभारलेल्या पतंजली फूड अँड हर्बल पार्कचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि केंद्रीय रस्ते आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते झालं. या प्रकल्पासाठी राज्य शासन सर्वतोपरी सहकार्य करणार असून संत्र्याची दर्जेदार कलमं तयार करण्यासाठी पतंजली आणि राज्यशासन सर्व सुविधांनी युक्त आधुनिक नर्सरी उभारेल, असंही त्यांनी सांगितलं.

या प्रकल्पाला दररोज सुमारे आठशे टन संत्र्यांची आवश्यकता असून यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ मिळणार असल्याचं नितीन गडकरी यावेळी म्हणाले. या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

श्रीलंकेत अविस्सवेल्ला इथं आज साईबाबांच्या मंदिराचं उद्घाटन झालं. भारताचे श्रीलंकेतले उच्चायुक्त संतोष झा, ग्लोबल शिर्डी साई फाउंडेशनचे सी. बी. सत्पथी तसंच मोठ्या संख्येनं भाविक यावेळी उपस्थित होते.

**//<><><><><>//**